# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः26.08.2025** **वारःमंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज गुजरातमध्ये हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोड्सचं स्थानिक उत्पादनाचं उद्घाटन करणार
2. भारतीय नौदलाच्या उदयगिरी आणि हिमगिरी या दोन अत्याधुनिक युद्ध नौकांचं आज जलावतरण
3. महाराष्ट्रात सर्वत्र गणरायाच्या स्वागताची तयारी उत्साहात सुरू आणि
4. अहमदाबादमध्ये झालेल्या राष्ट्रकुल भारोत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत मीराबाई चानू हिला सुवर्णपदक

**मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी गुजरातमधील अहमदाबादजवळील हंसलपूर इथं हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोड्सचं स्थानिक उत्पादन आणि शंभर देशांमध्ये निर्यात होणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांच्या ताफयाचे उद्घाटन करतील. या प्रसंगी मोदी उपस्थितांना संबोधितही करणार आहेत. मेक इन इंडिया उपक्रमाचं उदाहरण असलेल्या भारतात उत्पादन केलेल्या सुझुकीच्या पहिल्या बॅटरी इलेक्ट्रिक वाहनाचं आणि प्रदर्शनाचं उद्घाटन पंतप्रधान करतील. हे वाहन युरोप आणि जपानसारख्या प्रमुख बाजारपेठांसह शंभरहून अधिक देशांमध्ये निर्यात केले जाणार आहेत.

मोदी यांच्या हस्ते काल अहमदाबादमधील खोडलधाम मैदानावर 5 हजार 400 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. शेतकरी, पशुपालक आणि लघु उद्योजकांचं हित देशासाठी अत्यंत महत्त्वाचं आहे. त्यामुळे कोणत्याही दबावाखाली या गटांचं कोणतेही नुकसान होऊ देणार नाही, असं त्यांनी नंतर झालेल्या सभेत स्पष्ट केलं. 2047 पर्यंत भारत एक विकसित राष्ट्र बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**मोदी**

भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आलेले फिजीचे पंतप्रधान सितिवेनी राबुका यांनी काल सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. उभय नेत्यांमध्ये त्यानंतर द्विपक्षीय चर्चा झाली. उभय देशांमधील परस्पर संबंध दृढ होण्याच्या दृष्टीनं काही करारही करण्यात आले आहेत. भारत फिजीच्या विकासासाठी कटीबदह असल्याचं मोदी यांनी बैठकीनंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितलं. फिजीमध्ये भारत शंभर खाटाचं रुग्णालय उभारणार असल्याचं मोदी यांनी जाहिर कलं. पंतप्रधान मोदी यांनी काल राबुका यांच्यासाठी मेजवानीचं आयोजन केलं होतं.

**कृषिमंत्री**

केंद्र सरकारनं भारतीय शेतकऱ्यांचं हित आणि कल्याण यांना प्राधान्य देऊन अमेरिकेतून कृषी माल आयात करण्यास परवानगी देण्यास नकार दिला आहे, असं केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. भोपाळमधील भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था अर्थात आयसरच्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. नवीन भारत आत्मविश्वासानं परिपूर्ण असून आपल्याच लोकांच्या हिताचं रक्षण करण्याच्या बाबतीत तो कोणालाही घाबरत नाही. सरकार भारतातील शेतकरी आणि मच्छीमारांच्या हिताच्या विरोधात असणारा कोणताही करार करणार नाही, असंही त्यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी

भारतातील 144 कोटी नागरिकांना दैनंदिन वापरासाठी स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देण्याचे आवाहन केले होतं. त्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि अर्थव्यवस्था मजबूत होईल, असं त्यांनी सांगितलं.

**आयोग**

बिहारमधील 99 पूर्णांक 11 टक्के मतदारांकडून कागदपत्र मिळाली असून राज्यातील मतदार यादीच्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमा अंतर्गत दावे, हरकती आणि कागदपत्र दाखल करण्यासाठी अद्याप सात दिवस शिल्लक आहेत, असं केंद्रीय निवडणूक आयोगानं जाहीर केलं आहे. बूथ पातळीवरील अधिकारी आणि स्वयंसेवकांच्या मदतीनं राबविण्यात येणारी संकलन मोहीम पूर्वीच्या नियोजनाप्रमाणेच वेळेपूर्वी पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, असंही केंद्रीय निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे.

**सरकार समिती**

स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा, सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती तसंच भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचं जन्मशताब्दी वर्ष साजरं करण्यासाठी सरकारनं तीन उच्चस्तरीय समित्या स्थापन केल्या आहेत. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाचनं दिलेल्या माहितीनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या तिन्ही समित्यांचे अध्यक्ष असतील. देशभरातील विविध समारंभाच्या योजना आणि कार्यक्रम मंजूर करणे, त्यावर देखरेख करणे आणि मार्गदर्शन करण्याचे काम या समितीवर सोपवण्यात आलं आहे.

**युद्धनौका**

भारतीय नौदलाच्या उदयगिरी आणि हिमगिरी या दोन अत्याधुनिक स्टील्थ प्रकारच्या युद्ध नौकांचं जलावतरण आज विशाखापट्टणम इथल्या नौदल तळावर होणार आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. दोन वेगवेगळ्या शिपयार्डमध्ये बांधलेल्या दोन फ्रंटलाइन सर्फेस कॉम्बॅटन्स एकाच वेळी जलावतरण करण्याचा हा पहिलाच प्रसंग असेल. संरक्षण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार या दोन्ही जहाजांमध्ये रचना, शस्त्रे आणि सेन्सर प्रणालीमध्ये लक्षणीय सुधारणा करण्यात आल्या असून सागरी मोहिमांना सामोरं जाण्यासाठी सक्षम आहेत. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड, मुंबई इथं तयार झालेली उदयगिरी युद्धनौका आणि गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स कोलकाता इथं तयार झालेली हिमगिरी युद्धनौका हे देशाच्या वाढत्या जहाजबांधणी कौशल्याचं उदाहरण  आहे.

**गाझा**

दक्षिण गाझामधल्या एका रुग्णालयावर झालेल्या हल्ल्यात काल पाच पत्रकारांसह वीस जणांचा मृत्यू झाला, दरम्यान ही दुःखद दुर्घटना असल्याचं सांगत आपला देश पत्रकार आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या कामाला महत्त्व देत असून इस्रायलच्या लष्करी कारवाया नागरिकांवर नसून हमासवर आहेत, असं इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या कार्यालयानं म्हटलं आहे. तर गेल्या 22 महिन्यांच्या इस्रायल-हमास संघर्षात गाझामध्ये एकूण 192 पत्रकार मारले गेल्याचं पत्रकार संरक्षण समितीनं म्हटलं आहे.

**राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार**

केंद्र सरकारनं राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी देशभरातून 152 शिक्षकांची निवड केली असून त्यामध्ये राज्यातल्या 3 शिक्षकांचा समावेश आहे. नांदेडचे डॉ. शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीदोद्दिन, लातूरचे डॉ. संदीपान जगदाळे आणि मुंबईतल्या सोनिया कपूर यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. डॉ. शेख नांदेडमधल्या अर्धापूर इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत तर जगदाळे लातूरच्या दयानंद महाविद्यालयात शिकवतात. कपूर या मुंबईतल्या अणूऊर्जा महामंडळाच्या शाळेत शिक्षिका आहेत. येत्या 5 सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

**पेन्शन**

केंद्रीय अर्थ मंत्रालयानं नव्यानं सादर केलेल्या एकीकृत निवृत्तीवेतन योजने मधून राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीमध्ये एकदाच बदल करता येण्याची सुविधा सुरू केली आहे. ज्यामुळे कर्मचाऱ्यांना त्यांच्या निवृत्तीच्या एक वर्ष आधी किंवा स्वेच्छा निवृत्तीच्या तीन

महिने आधीपर्यंत उपलब्ध एकीकृत निवृत्तीवेतन योजनेतून राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीमध्ये स्थलांतर करता येईल. या योजनेअंतर्गत नोंदणी करण्याची शेवटची तारीख 30 सप्टेंबर आहे.

**गणेशोत्सव**

महाराष्ट्रात सर्वत्र गणरायाच्या स्वागताची तयारी सुरू आहे. गणेशोत्सव हा महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. यंदा गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानं ही ओळख आता आणखी दृढ होणार आहे. सार्वजनिक गणेश मंडळ, त्याचबरोबर घराघरातही गणरायाच्या स्वागताच्या तयारीची लगबग पहायला मिळत आहे. आकर्षक गणेश मूर्ती, सजावट आणि विविधरंगी विद्युत रोषणाईचं साहित्य, पूजा साहित्य, फुलं, आणि विविध प्रकारच्या आकर्षक मखरांनी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. गणरायाचं उद्या आगमन होत आहे; हा उत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी ठिकठिकाणचं स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा सज्ज झाल्या आहेत.

**गणेशोत्सव-मुंबई**

गणेशोत्सवानिमित्त टपाल विभागानं 'गणेश उत्सव-महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित चार पोस्टकार्डचा संच काल जारी केला. ज्येष्ठ सुलेखनकार अच्युत पालव यांनी यांनी या पोस्टकार्डचं रेखांकन केलं आहे. लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानं मुंबईत या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. मुख्य पोस्टमास्टर जनरल अमिताभ सिंह यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**वंदेभारत-नांदेड**

हजूर साहिब नांदेड ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनन्स मुंबई दरम्यानच्या पहिल्या विशेष वंदे भारत एक्सप्रेसला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दूरस्थ प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवतील. यावेळी अनेक मान्यवर हजूर साहिब नांदेड स्थानकावर उपस्थित असणार आहे. ही रेल्वे नांदेड आणि मुंबई दरम्यानचं 610 किलोमीटरचं अंतर फक्त 9 तास 25 मिनिटांत पूर्ण करेल, ज्यामुळे सध्याच्या देवगिरी एक्सप्रेसच्या तुलनेत प्रवासाचा वेळ दोन तासांनी कमी होईल. आठवड्यातून सहा दिवस ही रेल्वे धावेल.

**पोर्टल**

'आपले सरकार' या पोर्टलवरील सर्व सेवा व्हॉट्सॲपच्या माध्यमातून पुरवण्यात याव्यात; तसंच सर्व सेवा योग्यप्रकारे आणि गरजेनुसार पुरवण्यासाठी सर्व तालुक्यांमध्ये यंत्रणा तयार करावी, असे निर्देश महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. या संदर्भात काल मुंबईत झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. निबंधक, भागीदारी संस्था, मुंबई कार्यालयाच्या 2.0 या उन्नत संकेतस्थळाचं उद्घाटनही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. या संकेतस्थळांमध्ये केलेल्या सुधारणांमुळे नागरिकांचा पैसा आणि श्रमाची बचत होईल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**मीराबाई चानू**

भारताच्या मीराबाई चानू हिनं अहमदाबादमध्ये काल झालेल्या राष्ट्रकुल भारोत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं आहे. या विजयामुळे ग्लास्गो इथं पुढच्या वर्षी होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेचा तिचा प्रवेश निश्चित झाला आहे. मीराबाईने 48 किलो वजनी गटात राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धेतील विक्रम प्रस्थापित करत एकंदर 193 किलो वजन उचललं.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.